


IRBK-0109120

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा.
दा. क्र. ६१२०

# बालमनोरंजन

लेखक—वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.

आरंभीचे दोन

IRBK-0109120


माझ्या बालमित्रांनो, आज मी आठव्यांदा तुमच्या भेटीला येत आहें. मागें चार वेळां आलों होतों तेव्हां रामायण व भारत यांच्यांतल्या गोष्टी तुम्हांला सांगितल्या. पांचव्या खेपेला भागवतांतल्या गोष्टी सांगितल्या. सहाव्या खेपेला महात्मा गौतमबुद्ध यानें आपल्या शिष्यांना चांगल्या मार्गाला लावण्यासाठीं सांगितलेल्या जातक-कथा नांवाच्या गोष्टींची तुम्हांस माहिती करून देऊन नुकत्याच मी तुम्हांला साधुसंतांच्या गोष्टी सांगितल्या आहेत. आज ज्या गोष्टी तुम्हांला मी सांगणार आहें, त्या व्यवहारांत कसें वागावें या संबंधाच्या आहेत. व्यवहारांत वागणें हें काम फार कठिण आहे. कारण, त्यांत नानातऱ्हेच्या स्वभावांच्या लोकांशीं गांठी पडतात. त्यांतले कोणी चांगले असतात, तर कोणी फार लबाड आणि कपटी असतात; कोणी बाहेरून न दाखवितां खरोखर मनांतून प्रेम करणारे व दयाळु हितकर्ते असतात; तर कोणी याच्या अगदीं उलट म्हणजे बाहेरून अगदीं गोडगोड बोलणारे पण मनांतून गळा कापायला

पाहणारे, दुष्ट, घातकी, व नीच असतात. ते केव्हां व कशा रीतीनें भोळ्याभावड्या माणसाला फसवितील याचा नेम नसतो. आणखी, चांगलीं माणसें या जगांत फार थोडीं. पण अशा ढोंगी, घातकी आणि दुष्ट माणसांची संख्या फार मोठी असते. तेव्हां अशा लोकांना कसें ओळखून राहावें, त्यांच्या तावडींत न सांपडण्यासाठीं काय केलें पाहिजे व सांपडल्यास कशा युक्तीनें आपली सुटका करून घेतली पाहिजे हें कळणें अवश्य आहे. यालाच व्यवहारज्ञान म्हणतात. आपण स्वतः लबाडीलाताडी करूं नये; तें वाईट आहे. पण दुसऱ्याची लबाडी ओळखून तिच्यापासून आपलें नुकसान होणार नाहीं अशाविषयीं जपण्याचें ज्ञान माणसाला अवश्य आहे. हें ज्ञान तुम्हांला आतां मी सांगणार आहें. तें उंदीर, मांजर, कावळा, उंट, सिंह वगैरे प्राण्यांच्या पुढील गोष्टींवरून मिळेल. या गोष्टींत सोयीसाठीं म्हणून हे प्राणी कल्पिले आहेत येवढेंच. पण खरोखर पाहिलें तर माणसांच्या व्यवहारांतल्या त्या गोष्टी आहेत. म्हणूनच त्या फार उपयोगाच्या आहेत. तुम्ही त्या ऐकून त्यांपासून काय शिकायचें तें विशेषतः ध्यानांत ठेवा म्हणजे व्यवहारांत कसें वागावें याचें बरेंच ज्ञान तुम्हांला होईल. मुलांना व्यवहार कळावा यासाठींच त्या गोष्टी मुद्दाम विष्णुशर्मा नांवाच्या एका पंडितानें एका राजाच्या आज्ञेवरून मूळ संस्कृत भाषेत शेंकडों वर्षांच्या पूर्वीं लिहिल्या. त्या चांगल्या उपयोगी आहेत असें पाहून लोकांनीं पुढें त्यांचीं फारशी, आरबी, ग्रीक, इंग्रजी वगैरे अनेक भाषांतून भाषांतरें केलीं व त्यांचाच मराठींत सारांश सांगण्यासाठीं मी आज तुमच्या भेटीला आलों आहें. गोष्टी चांगल्या व उपयोगाच्या असल्याशिवाय इतक्या भाषांतून

त्यांचीं भाषांतरें कशाला होतील? व आज शेंकडों वर्षें लोकांमध्यें तरी त्या कशाला राहतील? अशा चांगल्या गोष्टी आपणांस ऐकायला मिळाव्या असें कोणास वाटणार नाहीं? त्या तुम्हांला ऐकण्यास मिळाव्या व तुम्हीं व्यवहार जाणणारे व्हावें ही माझी इच्छा. म्हणून आज विष्णुशर्मा पंडितानें केलेल्या हितोपदेश नांवाच्या संस्कृत पुस्तकांतल्या निवडक २७ गोष्टी तुम्हांला क्रमाक्रमानें आतां सांगतों; तिकडे नीट लक्ष द्या.

---

## १. पारवा आणि उंदीर



दक्षिणेंत गोदावरी नदीच्या तिरीं रानांत झाडांवर कांहीं पक्षी राहत होते. ते या झाडांवर रात्र काढीत आणि सकाळीं उजाडलें म्हणजे भक्ष्य मिळविण्यासाठीं उडून जात.

एके दिवशीं सकाळीं एक पारधी तांदुळाचे दाणे चोहींकडे जमिनीवर पसरून व जाळें लावून पक्षी ते खायला येतील व अडकले म्हणजे आपण धरूं, या आशेनें लपून बसला होता. हें लघुपतनक नांवाच्या एका कावळ्यानें पाहिलें होतें.

कांहीं वेळानें पारव्यांचा एक थवा आकाशमार्गानें उडत चालला होता. त्या पारव्यांना तांदुळाचे दाणे दिसले, आणि ते वेंचण्याची

बुद्धि त्यांना होऊं लागली. तेव्हां त्यांचा पुढारी चित्रग्रीव नांवाचा म्हातारा पारवा होता, तो म्हणाला, ‘ या रानांत माणसांची वस्ती नसतां येथें तांदुळाचे दाणे कसे आले ? येथें कांहीं तरी धोका असला पाहिजे खास तेव्हां नीट बारकाईनें पाहिलें पाहिजे. ’ पण हें त्याचें बोलणें दुसऱ्या कांहीं पारव्यांना रुचलें नाहीं. ते म्हणूं लागले, ‘ म्हातारीं माणसें अशींच शंकेखोर असतात. ज्या त्या गोष्टींत अशी शंका घेऊं लागलों, तर कांहींच न खातां न पितां उपाशी मरावें लागेल. ’ म्हाताऱ्याच्या म्हणण्याची अशी टर उडवून ते पारवे तांदुळाच्या लोभानें खालीं जमिनीवर उतरले आणि अर्थात् जाळ्यांत अडकून पडले. तें पाहून त्यांना धरण्यासाठीं लपून बसलेला पारधी धांवत जाऊं लागला. त्याला पाहून ते पारवे भीतीनें थरथर कांपूं लागले. तें पाहून चित्रग्रीव म्हणाला, ‘ मित्रांनो, तुम्ही माझें ऐकिलें नाहीं त्याचा पहा हा परिणाम झाला. आतां भिऊन काय होणार ? धैर्य धरून या संकटांतून पार पडलें पाहिजे. आतां सगळे मिळून या जाळ्यासकट उंच उडून जा, म्हणजे तरी प्राण वांचतील ! पारव्यांनीं तसें केलें, आणि हां हां म्हणतां ते जाळ्यासुद्धां आकाशांत भराऱ्या मारीत निघून गेले व पारधी आपला त्यांच्या तोंडाकडे आश्चर्यानें पाहत उभा राहिला !

बरेंच लांब गेल्यावर चित्रग्रीव म्हणाला, ‘ गड्यांनो, आतां आपण गंडकी नदीचे तीरीं जाऊं. तेथें माझा मित्र हिरण्यक नांवाचा उंदीर राहत असतो. तो आपल्या भोंवतालच्या जाळ्याच्या दोऱ्या दांतांनीं कुरतडून तुमची सुटका करील ’ तेव्हां ते तिकडे गेले.

हिरण्यक घरींच होता. आपला मित्र चित्रग्रीव आपल्या घरीं

आलेला पाहून त्याला आनंद झाला. चित्रग्रीवानें त्याला झालेली हकीकत सांगितली. तेव्हां हिरण्यक म्हणाला, 'मित्रा, मी पडलों एकटा. इतक्या सगळ्यांचे पाश माझ्यानें कसे तोडवतील ? तूं माझा मित्र, म्हणून तुला एकट्याला मी मोकळा करतों.' पण चित्रग्रीव म्हणाला, 'छे: छे: ! यांना असेच अडकलेले ठेवून मीं एकट्यानें मोकळें व्हावें हें मला पसंत नाहीं. अगोदर यांचे पाश तोड; मागून माझे.' चित्रग्रीवाचा हा मनाचा थोरपणा पाहून हिरण्यकाला संतोष झाला, व त्यानें हळूहळू सर्वांचे पाश तोडून त्यांना मोकळें केलें.

वर सांगितलेल्या लघुपतनक नांवाच्या कावळ्यानें आरंभापासून ही सगळी गोष्ट स्वत: डोळ्यांनीं पाहिली होती. त्याला चित्रग्रीव व हिरण्यक या दोघांचेंही थोरपणाचें वर्तन पाहून मित्र करावे तर असेच असें वाटलें व तोही त्यांना येऊन मिळाला.

**शिकावयाचें काय ?**—तर एकीचें बळ मोठें असतें ही एक गोष्ट; व जेथें सर्वांवर सारखें संकट येऊन पडलें असतें तेथें आपल्या एकट्याच्या हिताकडे न पाहतां सर्वांच्या हिताकडे अगोदर लक्ष द्यावें, यांतच थोरपणा आहे; ही दुसरी गोष्ट.



## २. कावळा व उंदीर

लघुपतनक व हिरण्यक यांची गट्टी जमल्यापासून ते रोज पुष्कळ वेळ एकमेकांशीं मोकळ्या मनानें बोलण्यांत व गप्पागोष्टी करण्यांत घालवूं लागले. एके दिवशीं लघुपतनक म्हणाला, 'गड्या, येथें माझें पोट नीटसें भरत नाहीं. म्हणून दुसरीकडे कोठें तरी जावें असें मला वाटूं लागलें आहे.' हिरण्यक म्हणाला, 'बाबारे, शहाणा असशील तर घर सोडून दूर जाऊं नकोस.' लघुपतनक म्हणाला, 'वा: ! तर मग काय घर म्हणून येथें राहून उपाशीं मरूं ? अरे, ज्याच्या मनगटांत जोर आहे तो कोठें गेला तरी आपलें पोट भरील. घरकोंबड्यासारखें एका जागीं बसून कुचंबत राहणें ही त्याला लाजिरवाणी गोष्ट आहे असें मी समजतों.' हिरण्यक म्हणाला, 'बरें तर. पण तूं जाणार कोठें ?' लघुपतनक म्हणाला, 'दंडकारण्यांत एक तळें आहे. तेथें मंथर नांवाचा एक कासव माझा मित्र आहे. तो मोठा धर्मशील आहे. त्याच्याकडे आपण जाऊं.' हिरण्यक म्हणाला, 'बरें आहे, चल. मीही येतों.'

मग ते दोघे बोलत बोलत त्या तळ्यापाशीं गेले. त्यांना पाहून मंथराला फार आनंद झाला. हे दोघे थकून आलेले पाहून मंथरानें फराळाला आणून दिलें. तें खाल्ल्यावर त्यांना अंमळ हुशारी वाटूं लागली.

ते तिघेही तेथें आनंदानें राहात असतां एके दिवशीं चित्रांग नांवाचा भीतीनें कावराबावरा झालेला एक हरिण धापा टाकीत तेथें आला. मंथरानें त्याला भिण्याचें कारण विचारिलें. तेव्हां तो म्हणाला, 'उद्यां या रानांत राजा शिकारीला येणार आहे असें मीं ऐकलें आहे. त्याच्या डेरेराहुट्या सुद्धां या तळ्यापाशीं येऊन पडल्या आहेत.' तें ऐकून सर्वच घाबरले. मंथर म्हणाला, 'मला आतां दुसरें तळें पाहिलें पाहिजे.' 'तें खरें, पण दुसऱ्या तळ्याला जाव-याचें तें जमिनीवरूनच ना ? तें तुझ्याच्यानें कसें होणार ? वाटेंतच कांहीं बरें वाईट होणार नाहीं कशावरून ?' अशी बाकीच्यांनीं त्यावर शंका काढली. पण मंथरानें कोणाचेंही न ऐकतां रस्ता धरला. तेव्हां बाकीचेही त्याच्या रक्षणासाठीं जरा दूर दूर चालत होते.

जातां जातां ते बरीच वाट चालून गेले. तळें अगदीं जवळ राहिलें होतें. इतक्यांत एका पारध्याची नजर त्या कासवाकडे गेली व आनंदित होऊन त्यानें त्या कासवाला धरलें व आपल्या तीर-कमठ्याच्या टोंकाला बांधून ठेविलें. आपल्या मित्राची झालेली अवस्था पाहून बाकीच्यांना फार दुःख झालें आणि आतां आपलेही जीव वांचविण्याकरितां व मित्राचीहि सुटका करण्याकरितां काय करावें, याचा ते सगळे मिळून विचार करूं लागले. शेवटीं त्यांना एक युक्ति सुचली. हिरण्यक म्हणाला, 'मित्रा चित्रांगा, तूं या तळ्याच्या कांठीं मेल्याचें सोंग घेऊन पड; व मित्रा लघुपतनका, तूं चित्रांगाच्या अंगावर बसून चोंचीनें त्याला टोंचीत आहेस असें दाखीव. म्हणजे तो पारधी हरिणाला पाहून त्याला धरण्यासाठीं आपल्या हातांतला तीरकामठा खालीं ठेवून तिकडे जाईल. तो तिकडे गेला म्हणजे

इकडे मी दांतांनीं दोरी कुरतडून मंथराची सुटका करीन व तो पळून तळ्यांत जाईल. पारधी जवळ आला म्हणजे तूंही ताडकन् उठून पळत सूट व लघुपतनक उडून जाईल.'

ही युक्ति सर्वांना पटून त्यांनीं त्याप्रमाणें केलें. तेव्हां त्या पारध्याचा बेत फसला व सर्वांचे जीव वांचले.

**काय शिकावयाचें?**—१ घरकोंबडें होऊन राहूं नये. धाडस करून आपल्या अंगचे गुण दाखवावे; २ मित्रांची सल्ला ऐकावी, आपलाच हट्ट चालवूं नये. ३ संकटाचे वेळीं घाबरून न जातां त्यांतून युक्तीनें पार पडावें.

---

## ३. वाघ आणि लोभी ब्राह्मण

एक तळें होतें; त्याच्या जवळून एक रस्ता गेला होता. त्या रस्त्यानें एक दरिद्री ब्राह्मण चालला होता. त्याच वेळीं एक म्हातारा वाघ तळ्यांत स्नान करून व हातांत कुश घेऊन उभा होता. वाघानें ब्राह्मणाला म्हटलें, 'अहो भटजी, मी तुम्हांला सोन्याचें कडें देतों तेवढें घ्या!' तें ऐकून ब्राह्मणाला लोभ सुटला. तथापि देणारा वाघ आहे हें लक्षांत येऊन तो आपल्या मनाशीं म्हणाला, 'असला लोभ उपयोगाचा नाहीं, त्याच्यापायीं जीव जावयाचा!' म्हणून तो अनमान करूं लागला. तें पाहून वाघ

म्हणाला, ‘भिऊं नका, मी जातीनें वाघ आहें; आणि मी तरुण होतों, तेव्हां क्रूरपणानें मीं पुष्कळांना मारलें, हीही गोष्ट कबूल आहे. पण ईश्वरानें त्याबद्दल मला चांगली शिक्षाही केली आहे. माझी बायको व मुलेंबाळें सगळीं मेलीं. तेव्हांपासून माझें चित्त उदास झालें आहे. आतां मी येथें रोज स्नान करतों व रोज कोणाला कांहीं दान करून पुण्यसंचय करीत असतों. शिवाय म्हातारपणामुळें माझी नखें व दांत हीं गळून पडलीं आहेत. मी इतका धार्मिक झालों आहें तरी वाघ माणसाला खातो ही लोकांची समजूत जात नाहीं हें माझें दुर्भाग्य म्हटलें पाहिजे. तुम्ही दरिद्री आहां हें पाहून मला तुमची दया येते, आणि म्हणून हें सोन्याचें कडें आज तुम्हांला द्यावें असें माझ्या मनानें घेतलें आहे. तेव्हां भटजी, एवढें तुम्ही घ्याच. नाहीं म्हणूं नका !’ वाघाचा येवढा आग्रह आणि मायावीपणाचें बोलणें ऐकून भोळ्या ब्राह्मणाला वाटलें कीं, हा म्हणतो तें खरें असेल. याला केलेल्या पापकर्मांचा पश्चात्ताप झाल्यामुळें हा धर्म करण्याला निघाला असेल. म्हणून ब्राम्हण स्नान करून दान घ्यावें अशा विचारानें तळ्यांत स्नानासाठीं उतरला, तो गाळांत फसला. मग अर्थातच वाघानें येऊन त्याला मारून खाल्लें.

**काय शिकावयाचें !**–१ दुष्टाच्या गोड गोड थापांवर कधीं विश्वास ठेवूं नये; २ लोभ हा नाशाला कारण होतो; म्हणून लोभांत कधीं गुंतूं नये.

१०.२६९०५
१२८७
३१३/१४



# कावळा व हरीण

मगध देशांत चंपकवती नांवाचें एक मोठें अरण्य आहे. तेथें एका चंपक वृक्षावर एक कावळा, व खालीं त्या वृक्षाच्या ढोलींत एक हरिण असे राहत असत. पाऊस चांगला पडल्यामुळें गवत, धान्य खूप उगवलें. तें खाऊन तो हरिण धष्टपुष्ट झाला होता. त्याला पाहून क्षुद्रबुद्धि नांवाचा एक कोल्हा मनांत म्हणाला, ' याचें लुसलुसीत मांस आपणास खाण्यास मिळेल अशी कांहीं तरी युक्ति केली पाहिजे. ' म्हणून तो कोल्हा हरिणाशीं लाडीगोडीचीं बोलणीं करूं लागला. हरिण बिचारा भोळा! त्याला तीं बोलणीं खरीं वाटलीं, आणि तो कोल्ह्याशीं मित्रासारखा मोकळ्या मनानें राहूं लागला.

हरिण आणि कोल्हा यांची मैत्री जुळली आहे हें पाहून कावळ्याला आश्चर्य वाटलें, आणि एके दिवशीं रात्रीं हरिण एकटा आहे असें पाहून कावळ्यानें त्याला म्हटलें, ' मित्रा , तुझ्याबरोबर अलीकडे हिंडतो फिरतो हा कोणरे ? ' हरिण म्हणाला, ' हा कोल्हा अलीकडे माझा मित्र झालेला आहे. ' कावळा म्हणाला, ' पूर्वींची कांहीं ओळखपाळख नसतां त्याच्याशीं तूं मैत्री करतोस याचा परिणाम मला धड दिसत नाहीं. ' हरिण हंसून म्हणाला, ' तूं बुवा भारी शंकेखोर आहेस. अरे, त्याचा स्वभाव किती गोड आहे म्हणून

सांगूं ! पूर्वींची ओळखपाळख नाहीं ही गोष्ट खरी. पण मीं तुला मित्र म्हटलें त्याच्या अगोदर तुझी माझी तरी कोठें ओळख होती ? उगाच तर्कट करीत बसूं नकोस. चल, मी तुझी त्याची ओळख करून देतों. मग आपण तिघेही ऐकमेकांचे मित्र होऊन आनंदानें राहूं.' कावळा म्हणाला, 'बरें आहे. उद्यां त्याचें पाहतां येईल.'

दुसरे दिवशीं उजाडल्याबरोबर कावळा आपलें भक्ष्य शोधण्यासाठीं निघून गेल्यावर कोल्हा हरिणाकडे येऊन म्हणाला, 'मित्रा, आज मी एक छानदार जागा पाहून आलों आहें; तेथें हवें तेवढें धान्य खाण्यास मिळेल. चल तुला मी ती जागा दाखवितों.' असें म्हणून कोल्हा त्याला एके जागीं घेऊन गेला. तेथें एका पारध्यानें जाळें लावून ठेविलें होतें. हरिण धान्य खाण्यासाठीं तेथें जातांच तो जाळ्यांत अडकला. तेव्हां यांतून मला सोडीव अशी तो आपल्या मित्राची ( कोल्ह्याची ) विनवणी करूं लागला. कोल्हा मनांत म्हणाला, 'माझ्या मनासारखें झालें. आतां पारधी याला मारून याचें मांस काढून नेईल, आणि मग रक्तमांसानें भरलेलीं याचीं हाडें मला चघळायला आयतीं मिळतील.' मनांत अशा मिटक्या मारीत पण बाहेरून दुःख झाल्यासारखें दाखवीत कोल्हा म्हणाला, 'तुझे पाश दातांनीं तोडून आपल्या मित्राची सुटका करावी असें मला पुष्कळ वाटतें. पण काय करूं ? या पाशाच्या दोऱ्या आहेत कातड्याच्या, अन् मला आहे आज आदितवाराचें व्रत. तेव्हां आज याला दांत लावून मी आपलें तोंड कसें विटाळवूं ? आजचा दिवस जाऊं दे, उद्यां सकाळीं व्रताचें पारणें केल्यावर मी तुझी सुटका करीन' असें बोलून तो दूर उभा राहिला.

संध्याकाळीं कावळा घरीं आला. पाहतो तों हरिण घरीं आला नाहीं. म्हणून तो त्याच्या शोधाला निघाला. शोध करतां करतां हरिण अडकला होता त्या जागीं तो आला. हरिणाची ती अवस्था पाहून त्याला फार वाईट वाटलें, आणि हरिणानें सांगितलेली हकीकत ऐकून ही सगळी त्या लुच्चा कोल्ह्याची लबाडी अशी त्याची खात्री झाली. आतां या संकटांतून मित्राची सुटका तर केली पाहिजे म्हणून कावळ्यानें त्या हरिणाला एक युक्ति सुचविली. तो म्हणाला, 'मित्रा, सकाळीं पारधी येईल तेव्हां मेल्याचें सोंग घेऊन आणि वातानें पोट फुगल्यासारखें करून पडून रहा. म्हणजे त्याला वाटेल कीं, तूं मेलास. अर्थातच तो तुझ्यासंबंधानें बेफिकीर राहील. मग मी ओरडेन. त्याबरोबर तूं ताडकन् उडी मारून पळून जा म्हणजे झालें.'

दुसरे दिवशीं सकाळीं पारधी आला, आणि हरिण मेल्याचें सोंग घेऊन पडला. कावळा झाडावर बसून राहिला. हरिण मेला आहे, तो आतां आपल्या हातून थोडाच निसटून जातो असें समजून पारध्यानें आपलें जाळें काढलें व तें तो गुंडाळूं लागला. इतक्यांत कावळा झाडावरून ओरडला. त्याबरोबर हरिण ताडकन् उड्या मारीत पळून गेला. हरिणानें आपणांस फसविलें हें पाहून पारध्यानें आपल्या हातांतला सोटा हरिणावर नेम धरून मारला. पण तो त्या हरिणाला न लागतां जवळ उभ्या असलेल्या कोल्ह्याला लागून त्याचा जीव गेला.

**काय शिकावयाचें ?**—लुच्च्याची संगत करूं नये. तो केव्हां कशा प्रकारें फसवील याचा नेम सांगतां येत नाहीं.

## ५. गिधाड आणि बोका

भागीरथी नदीच्या तीरीं एका झाडावर पुष्कळ पक्षी रहात होते. त्याच झाडावर जरद्गव नांवाचा एक वृद्ध गिधाड पक्षी राहत होता. वृद्धपणामुळें त्याला दिसेना व आपलें भक्ष्य मिळवितां येईना. पण इतर पक्षी आपण आणिलेल्या भक्ष्यांतून एकेक घास त्याला देऊन मदत करीत असत.

एके दिवशीं एक बोका पक्ष्यांचीं पिलें खाण्याच्या बुद्धीनें तेथें आला. त्याला पाहतांच तीं पिलें भिऊन जाऊन किलकिलाट करूं लागलीं. तो गोंधळ ऐकून जरद्गवानें विचारलें, ‘कोण आहे?’ बोका म्हणाला, ‘मी दीर्घकर्ण नांवाचा बोका आहें. माझा नमस्कार घ्यावा.’ बोक्याचा शब्द ऐकतांच जरद्गव म्हणाला, ‘चल, येथून चालता हो. नाहींतर प्राणास मुकशील.’ दीर्घकर्ण म्हणाला, ‘कृपा करून माझें म्हणणें अगोदर नीट ऐकून घ्या. मी गंगातीरीं स्नानसंध्या करून राहत असतों. मांसाहार करीत नाहीं. ब्रह्मचर्यानें राहून चांद्रायणव्रत करीत असतों. आपण अत्यंत धार्मिक आहां अशी आपली कीर्ति ऐकून आपल्यापासून धर्माच्या चार उपदेशाच्या गोष्टी ऐकण्याच्या हेतूनें आलों आहें.’ बोक्याचें हें मायावी बोलणें जरद्गवाला खरें वाटलें व त्यानें त्याला आपल्याजवळ राहूं दिलें. बोक्यानें तेथें राहून रोज पारव्यांचीं एक दोन पिलें खाण्याचा क्रम ठेविला. रोज पिलांची संख्या कमी कमी होऊं लागली. तेव्हां पक्षी

त्याचें कारण शोधायला लागले. हें पाहून बोक्यानें तेथून पळ काढला. शोध करतां करतां जरद्गवाच्या घरट्यांत पिलांच्या हाडांचा खच पडलेला त्या पक्ष्यांना दिसला. अर्थांत हा जरद्गवच आपलीं पिलें खात असला पाहिजे अशी त्यांच्या मनाची खात्री होऊन त्यांनीं त्याला शोधून काढून मारून टाकलें.

**काय शिकावयाचें !**—माणसाची नीट परीक्षा केल्यावांचून त्याची संगति करूं नये. नुसत्या बोलण्याच्या भपक्यावर न जातां आचरण पाहावें, आणि तें चांगलें दिसलें तर त्याची संगत धरावी. नाहींतर फसगत होते.

## ६. पारधी आणि कोल्हा



एका पारध्यानें एकदां एक हरिण मारलें. त्याला एके ठिकाणीं एक डुकर लपून बसलेलें आढळलें. त्याला मारण्यासाठीं त्यानें हरिणाला खालीं ठेविलें आणि डुकरावर नेम धरून एक बाण मारला. बाणानें जखमी झालेलें डुकर चवताळून त्या पारध्याच्या अंगावर धावलें, आणि त्यानें असा जोरानें धक्का दिला कीं, तो चारी मुंड्या चीत होऊन जमिनीवर मरून पडला. इकडे त्या बाणाच्या जखमेनें

घायाळ झालेलें डुकरही मरून धाडकन् जमिनीवर पडलें. त्याच्या अंगाखालीं एक सर्प चेंगरून मेला.

इतक्यांत एक भुकेलेला कोल्हा तेथें आला आणि तें हरिण, पारधी डुकर व सर्प हीं सगळीं मेलेलीं पाहून आनंदित होऊन मनाशीं म्हणाला, ‘ वाहवा ! आपली चंगळ झाली ! आतां चार महिने यावर सहज काढतां येतील ! आतां आपण हें सगळें मांस पुढच्या-करितां राखून ठेवून आजचा दिवस या धनुष्याला लावलेल्या कात-ड्याच्या दोरीवरच काढूं. ’ असें म्हणून तो धनुष्याच्या एका टोकाशीं बसून त्याची दोरी कुरतडूं लागला. ती दोरी तुटल्यावर वाकविलेलें धनुष्य एकदम सरळ होऊन त्या धनुष्याच्या तीक्ष्ण टोंकाचा ठोसा असा जोरानें त्याच्या छातीला लागला कीं त्यानें तो कोल्हा तात्काळ मेला.

**काय शिकावयाचें ?—फार लोभ धरूं नये.**

## ७. बैल आणि सिंह

एक सावकार होता. तो बैलाच्या गाडींत बसून अरण्यांतून जात असतां गाडीच्या दोन बैलां-पैकीं संजीवक नांवाच्या एका बैलाचा पाय जखमी होऊन तो खालीं बसला. त्याच्यानें चालवेना. तेव्हां साव-कारानें आपला नोकर शेजारच्या गांवीं पाठवून तेथून एक बैल

आणविला व गाडी पुढें नेली. संजीवकाला त्यानें त्या रानांतच सोडून दिलें.

पुढें कांहीं दिवसांनीं संजीवक चांगला खडखडीत बरा होऊन हिंडू फिरूं लागला.

त्या रानांत एक सिंह होता. सिंह हा पशूंचा राजा. एके दिवशीं तो पाणी पिण्यासाठीं नदीवर गेला असतां त्यानें संजीवकाची मोठी गर्जना ऐकली. तेव्हां हा कोणी तरी नवा प्राणी आपल्या राज्यांत आला आहे, त्याची शक्ति किती आहे हेंही आपणांस ठाऊक नाहीं, तेव्हां तो आपलें राज्य घेईल कीं काय कोण जाणे अशी काळजी त्या सिंहाला वाटली, आणि तो तसाच पळत पळत माघारा गेला. त्याचा प्रधान एक कोल्हा होता व त्या प्रधानाला करटक व दमनक असे दोन मुलगे होते. राजाची कावरीबावरी झालेली मुद्रा पाहून दमनकानें त्याचें कारण विचारलें. राजानेंहि विश्वासानें खरा प्रकार त्याला सांगितला. तेव्हां दमनक धीर देऊन म्हणाला, ' संकट तर खरेंच, पण महाराजांनीं स्वस्थ असावें. करटकाला विश्वासांत घ्यावें म्हणजे आम्ही उभयतां खास त्या संकटाला राज्याच्या पार हाकलून लावूं. ' राजानें खूष होऊन दोघांही भावांना पुष्कळ इनामें दिलीं.

दमनकाची संजीवकाशीं ओळख होतीच. दमनक त्याच्याकडे जाऊन म्हणाला, ' वनराजानें या वनाच्या रक्षणाचें काम माझ्याकडे सोपविलें आहे. सेनापति करटक यानें तुला बोलाविलें आहे. आलास तर ठीक आहे. नाहींपेक्षां तुला येथून घालवून देण्याचा मला हुकूम झाला आहे. ' संजीवक जाण्यास कबूल झाला. दमनक त्याला करटकाकडे घेऊन गेला. संजीवकानें विचारिलें, ' काय हुकूम आहे ? '

करटक म्हणाला, 'तुला जर या वनांत राहावयाचें असेल तर अगोदर राजाला मुजरा करून ये.'

**संजीवक**—मला भीति वाटते. तो मला कदाचित् खाईल.

**करटक**—त्याची तुला काळजी नको. आम्ही तुझें रक्षण करूं.

इतका धीर मिळाल्यावर संजीवक राजाकडे जाण्यास कबूल झाला. दमनक व करटक हेही त्याच्याबरोबर गेले. संजीवकाला दूर उभें करून ते दोघे भाऊ सिंहाकडे जाऊन म्हणाले, 'महाराज, आपण ज्याला भितां तो प्राणी आम्ही पाहून आलों. आपली भीति अगदीं वाजवी आहे. आहेच तो तसा बळवान्! आणि आतां तर तो प्राणी आपल्या भेटीला आला आहे; आपण तयार रहावें.' त्याप्रमाणें राजानें उसनें अवसान आणून त्याची भेट घेतली. राजाची भेट घेऊन संजीवक निघून गेला, तेव्हां राजाला थोडा धीर आला. हळूं हळूं संजीवक राजाचा मित्र झाला.

पुढें एके दिवशीं राजाचा भाऊ त्याच्या घरीं पाहुणा आला. राजानें त्याचा मोठा सत्कार करून त्याला आपल्या येथें ठेवून घेतलें, आणि त्याला मेजवानी करण्याच्या हेतूनें राजा स्वतः शिकारीला निघाला. तें पाहून संजीवकानें विचारिलें, 'महाराज, आज सकाळीं इतके पशु मारले, त्यांचें मांस काय झालें?'

**राजा**—तें मला माहीत नाहीं. आमचे प्रधानपुत्र दमनक व करटक यांच्याकडे त्याची व्यवस्था सोंपविली आहे.

**संजीवक**—मांस शिल्लक आहे कीं नाहीं याचीहि आपणास खबर नाहीं?

**राजा**—खरोखर नाहीं.

**संजीवक**—दोघां भावांनीं इतकें मांस खाऊन टाकलें ?

**राजा**—कांहीं खाल्लें, कांहीं खराब झालें, मिळून तें सारें खर्च झालें.

हें बोलणें चाललें असतां राजाचा भाऊ जवळ होता. तो तें ऐकून म्हणाला, 'दादासाहेब, अशा प्रधानांच्या हातांत तुमच्या खजिन्याच्या किल्ल्या असणें बरोबर नाहीं. हा संजीवक पहा कसा इमानी आहे ? हा गवत खाऊन आपली चाकरी करतो. मांसाला तोंड लावीत नाहीं. मांसाचें कोठार तुम्ही त्याच्या स्वाधीन करा म्हणजे तुमचें नुकसान होणार नाहीं.' राजानें आपल्या भावाचें म्हणणें ऐकून मांसाचें कोठार करटक-दमनकांच्या हातांतून काढून संजीवकाच्या हातीं दिलें. करटक व दमनक या दोघांनाही अर्थात् संजीवकाचा राग आला व ते त्याचा सूड घेण्याचा विचार करूं लागले.

एके दिवशीं संजीवक रानांत दूर गेला आहे व राजा एकटाच आहे अशी संधि पाहून दमनक मुजरा करून व हात जोडून म्हणाला, 'महाराज, आपल्या राज्यावर एक मोठें संकट आलें आहे.'

**राजा**—कसलें संकट ? बोल पाहूं !

**दमनक**—हा संजीवक आपलें राज्यपद घ्यायला पहात आहे. आणि आपण तर सगळा अधिकार त्याच्या हातीं देऊन बसलां आहां.

हें ऐकतांच राजा घाबरला. तथापि घाबरल्यासारखें न दाखवितां म्हणाला, 'असें आहे काय ? मी तर त्याला चांगला विश्वासु समजत होतों. बरें तर; आतां त्याला शिक्षा करून येथून हाकललें पाहिजे.'

दमनक—महाराज, नाहीं, तें बरें नाहीं. त्याला आपण ओळखून राहावें, पण शिक्षा करण्याविषयीं चकार शब्द त्याच्या देखत तोंडांतून काढूं नये. राज्यपद घेण्यासाठीं तो शिंगें उगारून आपणांस मारायला आलाच, तर मात्र त्याची क्षमा करतां उपयोगाची नाहीं. मग त्याला मारलेंच पाहिजे.

राजा—पण त्याला मारण्याइतकी शक्ति आपल्यांत कोठें आहे ?

दमनक—जे सरळपणानें व न्यायानें वागतात त्यांना साह्य भगवान् करतो. आपणांला भय कशाला बाळगायला पाहिजे ?

इतकें बोलणें झाल्यावर दमनक मुद्दाम खिन्न मुद्रा करून संजीवकाकडे गेला. त्याची ती खिन्न मुद्रा पाहून संजीवकानें विचारलें, ' दमनका, आज तूं असा दुःखीकष्टी कां दिसतोस ? '

दमनक—काय सांगूं ? ज्या माझ्या भरंवशावर तूं येथें इतके दिवस राहिलास, त्या माझ्यावरच एक भयंकर बातमी तुला कळविण्याचा दुःखाचा प्रसंग दुर्दैवानें आणिला आहे. तुझ्यावर राजाची अतिशय नाराजी झाली आहे, आणि तुला ठार मारण्याचा त्याचा विचार ठरला आहे.

ही बातमी ऐकून संजीवकाचे तर हातपायच गळाले, आणि आतां काय करावें या विचारांत तो पडला.

दमनक—आतां दुःख करून काय उपयोग ? गोड बोलून मान कापण्याचा महाराजांचा स्वभावच आहे. नको अशांची नोकरी असें मला झालें आहे.

संजीवक—आतां एर्वीतेर्वी मी मरणारच. मग दोन हात करून मेलेलें काय वाईट ? असें मला वाटतें. पण अगोदर मला हें सांग

कीं, महाराज रागावले आहेत हें कशावरून समजावें ?

**दमनक**—अरे, तूं त्यांच्या समोर गेलास कीं ते कान ताठ उभे करतील, शेपटी उभारतील, पाय वर करतील, आणि तुला गिळून टाकण्यासाठीं तोंड फाडून बसतील. यावरून तुझ्यावरचा राग तूं समजून घे. पण या त्यांच्या रागाच्या आविर्भावानें तूं भिऊन पळूं मात्र नकोस. तुला आपला काय पराक्रम दाखवावयाचा असेल तो दाखवायला कमी करूं नकोस म्हणजे झालें.

संजीवकाला दमनकाचें हें कपट कळलें नाहीं. तो सिंहाशीं लढण्यास तयार होऊन जाऊं लागला. दमनक त्याच्यापुढें अगोदर जाऊन सिंहाला म्हणाला, ' महाराज, असे स्वस्थ काय बसलां ? तो दुष्ट संजीवक आपल्यावर चाल करून आला आहे. त्याला खाण्यासाठीं तयार असा.' तो इतकें बोलत आहे इतक्यांत संजीवक तेथें आवेशानें आलाच.

सिंहाची व संजीवकाची झटापट होऊन तींत सिंहानें संजीवकाला मारून टाकलें.

दमनकानें वेळींच आपणांस सावध केलें म्हणून आपणांस शत्रूला मारतां आलें अशी सिंहाच्या मनाची खात्री होऊन चुकली व तेव्हांपासून त्याची त्या दोघां भावांवर अधिक मर्जी बसली, आणि ते सुखानें राजाचे प्रधान होऊन चंगळ करीत राहिले. बिचारा संजीवक मात्र निष्कारण ठार झाला.

**काय शिकावयाचें ?**—मोठ्या लोकांजवळ धूर्त व कपटी लोक पुष्कळ असतात. ते स्वतःच्या मतलबासाठीं उगाच लावालावी करीत असतात. शहाण्या माणसानें अशांना पुरतेपणीं ओळखून त्यांच्या—

पासून दूर रहावें. मोठ्यांनींहि अशा लोकांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून कोणावरही राग किंवा लोभ करूं नये.

---

## ८. खोडकर वानर

एक वानर रानांत रहात असे. त्या रानाच्या जवळच एक गांव होतें. त्या गांवांत एक सावकार घर बांधीत होता. त्या घरासाठीं लांकूड कापण्याचें काम चाललें होतें. कापतां कापतां दुपारची जेवणाची वेळ झाली म्हणून कापणारे लोक अर्धवट चिरलेल्या दोन फळ्यांच्या मध्यें लांकडाची पाचर घालून जेवणासाठीं निघून गेले.

इकडे तो वानर त्या ठिकाणीं आला. वानराच्या जातीचा स्वभाव खोडकर असतो हें तुम्हांस ठाऊकच आहे. त्यानें त्या फळ्यांच्या फटीमध्यें पाय घालून पाचर जोरानें उपटून काढली. त्याबरोबर त्याचे पाय त्या फळ्यांमध्यें सांपडून दाबले गेले. त्यामुळें प्राणांतिक वेदना होऊन तो मेला.

**शिकावयाचें काय ?**—स्वतःला किंवा दुसऱ्या कोणाला अपाय होईल अशा खोड्या करूं नयेत.

---

# ९. सिंह आणि उंदीर

एका डोंगराच्या गुहेंत एक सिंह रहात होता. तो निजला म्हणजे एक उंदीर हळूच बिळांतून बाहेर पडून त्याच्या केसांचीं अग्रें कुरतडीत असे. सिंहाच्या ध्यानांत एके दिवशीं ही गोष्ट आली, आणि त्यानें उंदराला धरण्याचें मनांत आणिलें; पण उंदीर चटकन् बिळांत घुसे, त्यामुळें तो हातीं लागेना.

एके दिवशीं सिंहानें एका मांजराला गांठलें आणि त्याला म्हटलें कीं, तूं माझ्याजवळ येऊन रहाशील तर मी रोज तुला गोड गोड मांस खाण्यास देईन. तूं जवळ असलेंस म्हणजे उंदीर येणार नाहीं आणि मला स्वस्थ झोंप मिळेल. मांजरानें तें कबूल केलें, आणि तें सिंहाच्या गुहेंत जाऊन राहिलें. मांजराच्या भयानें उंदीर येईनासा झाला व सिंहाला स्वस्थ झोंप मिळूं लागली. सिंहही त्याला खाण्याला मांस देऊं लागला.

एके दिवशीं उंदीर फार भुकेला झाला होता. म्हणून तो भक्ष्य शोधण्यासाठीं बिळाच्या बाहेर पडला. लागलेंच मांजरानें झडप घालून त्याला धरलें आणि गट्ट केलें. उंदीर मारला गेला, तेव्हां आतां आपणांस मांजराची गरज नाहीं असें पाहून सिंहानें मांजराला मांस देण्याचें बंद करून त्याला आपल्या गुहेंतून हांकून दिलें.

**काय शिकावयाचें ?**—पोटासाठीं दुसऱ्याची चाकरी पत्करणा-

राला सर्वस्वीं दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागतें. यासाठीं होतां होईल तो माणसानें स्वतंत्र धंदा करावा.

## १०. घंटा वाजविणारें वानर

डोंगराळ प्रदेशांत एक गांव होतें. त्या गांवाशेजारच्या अरण्यांत घंटाकर्ण नांवाचा कोणी राक्षस राहतो अशी लोकांची समजूत होती. एके रात्रीं एक चोर एका माणसाच्या घरांतून घंटा चोरून घेऊन रानांत पळून गेला. रात्रींची वेळ होती. रानांत वाघ इकडे तिकडे फिरत होते. त्यांपैकीं एका वाघानें त्या चोराला मारून खाल्लें. त्याच्या हातांतली घंटा तेथें रानांत राहून गेली. दुसरे दिवशीं ती एका वानरानें पाहिली, आणि घंटा वाजवीत वाजवीत तो या झाडावरून त्या झाडावर उड्या मारूं लागला. त्या घंटेचा नाद ऐकून लोक म्हणूं लागले कीं, 'पाहिलें ? घंटाकर्ण राक्षसानें चोराला खाल्लें व रागारागानें तो घंटा वाजवीत आहे.'

ही बातमी हां हां म्हणतां सर्व गांवभर पसरली, तेव्हां सगळे लोक तें गांव सोडून जाऊं लागले. राजालाही काळजी पडली. त्या गांवांत एक बाई होती. ती फार चतुर होती. तिनें एका झाडावर चढून पाहिलें, तेव्हां कोण घंटा वाजवितो तें तिला बरोबर कळलें.

तिनें राजाकडे जाऊन त्याला म्हटलें कीं, मला कांहीं द्रव्य द्याल

तर मी घंटाकर्ण राक्षसाला मारून टाकीन. राजानें तिला पुष्कळ द्रव्य दिलें. मग तिनें पूजेचें साहित्य तयार करून वानरास आवडतील अशीं पुष्कळ फळें बरोबर घेतलीं, आणि रानांत जाऊन तीं फळें चारी दिशांना फेकलीं. तीं फळें पाहतांच वानरांच्या झुंडीच्या झुंडी धांवत आल्या. त्यांत तें घंटा वाजविणारें वानरही आलें. मग त्या बाईनें त्या वानराला फळें खाण्याच्या नादांत गुंतवून त्यानें जमिनीवर ठेवलेली घंटा लपवून ठेविली.

त्या दिवसापासून त्या गांवांत घंटेचा आवाज ऐकूं आला नाहीं. तेव्हां त्या बाईनें घंटाकर्णाला मारलें, अशी राजाची खात्री होऊन त्यानें तिला पुष्कळ बक्षीस दिलें.

**शिकावयाचें काय?**—भयाचें कारण माहीत नसतां लोक उगाच गप्पांवर भरंवसा ठेवून फसत असतात. याकरितां शहाण्या माणसानें या गप्पांवर न जातां स्वतः बारकाईनें भयाचे कारणाचा तपास करावा. म्हणजे अगदीं क्षुल्लक कारणावरून लोक विनाकारण कसे घाबरून जातात हें दिसून येतें.

## ११. राजकुमार व रत्नमंजरी

कंदर्पकेतु नांवाचा सिंहलदेशाचा एक राजपुत्र होता. तो आपल्या सोबत्यासंगतीं खेळत असतां एक गलबत समुद्रकिनाऱ्याला लागलें. त्या गलबतावरल्या खलाशांनीं राजपुत्राला सांगितलें कीं, पलीकडे

समुद्रांत जेथें मोठाल्या लाटा उसळत आहेत तेथें चतुर्दशीचे दिवशीं एक कल्पवृक्ष दिसतो व त्या वृक्षाखालीं रत्नजडित कोचावर एक सुंदर स्त्री वीणा वाजवीत बसते. त्या वीण्यांतून इतके मधुर आलाप ती काढते कीं, त्याच्या योगानें खवळलेला समुद्र शांत होतो, वायु निश्चल राहतो, व चंद्रसूर्यही घटकाभर आपापलीं कामें बंद ठेवतात. हें वर्णन ऐकून त्या सुंदरीला पाहण्याची राजकुमाराला अत्यंत उत्सुकता झाली व तो चतुर्दशीची वाट पहात बसला. त्या दिवशीं तो एकटाच गलबतांत बसून निघाला व सांगितलेल्या ठिकाणीं गेला. पाहतो तों खलाशांनीं वर्णन केल्यापेक्षां अधिक रमणीय स्थान त्याला दिसलें. सुंदरीला पाहून व वीण्याचा नाद ऐकून तो अगदीं गुंग होऊन गेला. कांहीं वेळानें ती स्त्री पाण्याच्या वेगानें तळाशीं गेली. राजकुमारहि समुद्रांत उडी टाकून तिच्या मागोमाग गेला. जातां जातां ती एका सुवर्णाच्या राजवाड्यांत गेली. राजपुत्रहि वाड्यांत शिरला. सुंदरी एका रत्नजडित कोचावर बसली व अनेक सुंदर दासी तिच्या सेवेला लागल्या. राजकुमारानें त्यांपैकीं एका दासीला त्या सुंदरीविषयींची माहिती विचारली तेव्हां ती म्हणाली कीं, ही एका विद्याधराची मुलगी आहे. हिचें नांव रत्नमंजरी. हिनें असा पण केला आहे कीं, जो पुरुष या वाड्यांत पाय ठेवील त्याच्याशीं लग्न करावयाचें. तुम्ही मोठे भाग्यवान् म्हणून येथें आलां आहां. आतां ही तुमच्याशींच विवाह करील.

ती म्हणाली तसेंच झालें. राजपुत्राचा व तिचा विवाह झाला, व तिनें त्याला पुष्कळ दिवस आग्रहानें ठेवून घेतलें. मात्र येवढें बजावून सांगितलें कीं, तुम्ही येथें हव्या त्या सुखाचा उपभोग घ्या,

मात्र त्या स्वर्णरेखेनें काढलेल्या तसबिरीला स्पर्श करूं नका.

हें बजावल्यापासून तर त्या तसबिरींत अशी काय जादू भरली आहे तें पाहण्याची त्याला अधिकच उत्कंठा झाली, आणि रात्रीं रत्नमंजरी निजली असतां त्यानें त्या तसबिरीला स्पर्श केला. त्या-बरोबर त्याच्या पाठींत अशी जोराची लाथ बसली कीं, त्यामुळें तो सिंहल देशांतल्या आपल्या वाड्याच्या दारांत येऊन पडला. तेव्हां त्याला फार पश्चात्ताप वाटला. पण काय उपयोग ?

शिकावयाचें काय ?—अमकी एक गोष्ट करूं नको असें बजा-विलें म्हणजे ती गोष्ट मुद्दाम करण्याची पुष्कळ वेळां इच्छा होते. पण ती प्रयत्नानें दाबली पाहिजे. नाहींतर तीच पश्चात्तापाला कारण होते.

---

## १९. कावळा व काळा नाग

एका झाडावर कावळा व त्याची मादी असें जोडपें राहत होतें. त्याच झाडावर एक काळा नागहि राहत असे. तो नाग कावळ्याचीं पिलें खाऊन टाकी. म्हणून एके दिवशीं मादी कावळ्याला म्हणाली, 'आपण हें झाड सोडून दुसरीकडे राहाण्यास जाऊं. हा नाग आपल्या पिलांना जगूं देत नाहीं !' कावळा म्हणाला, 'त्याचा बंदोबस्त येथें राहून सहज करतां येईल.' मादीनें विचारलें, 'पण

त्याच्या इतकें बळ आपणांत कोठें आहे ?' कावळा म्हणाला, 'अग, तुला समजत नाहीं. बुद्धि हेंच बळ आहे. मी तुला उद्यां चमत्कार दाखवितों पहा. त्या पलीकडच्या तळ्यावर राजपुत्र रोज स्नानासाठीं येतो आणि गळ्यांतला रत्नहार कांठावर ठेवून पाण्यांत उतरतो. उद्यां तो त्याचा हार उचलून आणून आपण या झाडावर ठेवूं. मग राजाचे नोकर या हाराचा शोध करीत करीत येथें येतील व काळ्या नागाला मारतील आणि आपलें आयतेंच काम होईल.' दुसरे दिवशीं कावळ्यानें तो हार उचलून आणिला. मागोमाग शिपाई शोध करीत आले आणि हार घेण्यासाठीं झाडावर चढले. तों त्यांना तो काळा नाग दिसला. त्याबरोबर त्यांनीं त्याला मारून टाकलें.

**शिकावयाचें काय ?**—शरीरबळापेक्षां बुद्धीच्या बळानें मोठालीं कार्यें होतात. तेव्हां तें अवश्य मिळवावें.

---

## १३. टिटवी आणि समुद्र

समुद्राच्या कांठीं एके ठिकाणीं टिटवीपक्ष्यांचें जोडपें राहत होतें. त्यांतली मादी नराला म्हणाली, 'ही जागा अंडीं घालण्यास सोयीची नाहीं, कारण येथें समुद्राच्या लाटा आपल्या घरट्यापर्यंत येऊन पोंचतात. आपण दुसरीकडे जाऊं.' नर म्हणाला, ' नाहीं. आपल्या घरट्यापर्यंत येऊन तुझीं अंडीं घेऊन

जाण्याला समुद्राची काय छाती लागली आहे ! ' नराच्या सांगण्यावरून तिनें तेथेंच अंडीं घातलीं, आणि समुद्राच्या लाटांनीं तीं वाहून गेलीं. तें पाहून टिटवी रडायला लागली. नर म्हणाला, 'कांहीं चिंता नाहीं. या समुद्राची खोड मोडतों पहा.' असें म्हणून त्यानें सगळे सोबती ( पक्षी ) जमा केले. ते सगळे मिळून गरुडाकडे गेले आणि आपल्या दुःखाची कहाणी सांगूं लागले. गरुड विष्णूकडे गेला आणि त्याच्या हुकुमानें समुद्राला टिटवीचीं अंडीं परत द्यावीं लागलीं.

**शिकावयाचें काय ?**—एकीचें बळ मोठें असतें. त्या बळावर अचाट कामें करतां येतात. थेट राजापर्यंत फिर्याद पोहोंचवून दाद लावून घेतां येते.

## १४. मोर आणि राजहंस

कर्पूरद्वीप देशांतल्या एका सरोवरांत हिरण्यगर्भ नांवाचा एक राजहंस पक्षी राहत असे. सगळ्या जलचर पक्ष्यांनीं त्याला आपला राजा केलें होतें.

एकदां राजहंस आपल्या मंडळीबरोबर गोष्टी बोलत बसला असतां दीर्घमुख नांवाचा बगळा तेथें आला. राजानें त्याला म्हटलें, 'तूं फार लांबून आला आहेस. तेव्हां कांहीं बातमी आणली असशीलच.' दीर्घमुख म्हणाला, "महाराज होय. मीं आणलेली बातमी ऐकण्या-

सारखी आहे खरी. विंध्यपर्वतावरील एका अरण्यांत चित्रवर्ण नांवाचा एक मोर स्थलचर पक्ष्यांवर राज्य करीत असतो. मी त्या अरण्यांत गेल्याबरोबर त्या राजाचा एक दूत येऊन 'तुम्ही कोण? कोठून आलां?' वगैरे चौकशी करूं लागला. मीं खरी गोष्ट होती ती सांगितली. त्यावरून तेथील स्थलचर पक्षी मला विचारूं लागले कीं, 'हा देश व तुमचा देश यांच्यांत चांगला देश कोणता असें तुम्हांला वाटतें?' मीं म्हटलें, 'कोठें स्वर्गासारखा आमचा देश आणि कोठें वाळवंटासारखा हा तुमचा देश! दोघांची तुलना करणेंच मूर्ख-पणाचें आहे.' हें ऐकतांच ते पक्षी रागावले, आणि मला पकडून त्यांच्या राजाकडे घेऊन गेले. मी तेथील राजाची निंदा करीत होतों असें त्यांनीं आपल्या राजाला कळविलें. त्या राजाचा प्रधान दूरदर्शी नांवाचा एक गृध्र होता. त्यानें मला विचारिलें, 'तुमच्या देशांत प्रधान कोण आहे?' मीं म्हटलें, 'चक्रवाक नांवाचा आमच्या राजाचा प्रधान आहे, व तो सर्व शास्त्रें जाणणारा आहे.' तेव्हां त्या राजाच्या दरबारांतला एक पोपट उठून म्हणाला कीं, 'कर्पूर-द्वीपावर आपलेंच राज्य आहे.' मीं म्हटलें, 'तसें म्हणावयाचें तर येथें सुद्धां आमच्या हिरण्यगर्भ महाराजांचें राज्य आहे असें मला म्हणतां येईल.' असा वाद पडला, तेव्हां युद्धाशिवाय हा वाद मिटावयाचा नाहीं असें पाहून, तेथील राजानें युद्धासाठीं तयार होण्याविषयीं आपणांस सांगण्यास मला पाठविलें आणि माझ्याबरो-बर आपल्या दरबारच्या पोपटालाहि दिलें आहे. यावर महाराजांचा हुकूम होईल तो खरा."

दीर्घमुखाच्या या हकीकतीनें दरबारांत एकच गडबड उडवून

दिली. चक्रवाक प्रधानाच्या सल्ल्यानें सेनापतीचा अधिकार सारसाला देण्यांत येऊन किल्ल्याचा नीट बंदोबस्त ठेवण्याविषयीं त्याला हुकूम झाला. कांहीं वेळानें चौकीवरल्या शिपायानें येऊन सांगितलें कीं, 'महाराज, सिंहलद्वीपाहून मेघवर्ण नांवाचा एक कावळा आपला आश्रय मागण्यासाठीं आला आहे व चित्रवर्ण राजाकडून एक पोपटहि आपल्या भेटीसाठीं आला आहे.' राजानें विचार केला कीं, कावळा बुद्धिमान् असतो. त्याचा एखाद्या चांगल्या कामीं आपणांस उपयोग करून घेतां येईल. त्यानें तो आपला विचार प्रधानाला सांगितला. तेव्हां प्रधान चक्रवाक म्हणाला, 'महाराज, बुद्धिमान् असला म्हणजे तो विश्वासास पात्र असतोच असें समजूं नये. कावळा हा स्थलचर पक्षी—अर्थात् आपला शत्रु—आहे. त्याला आपल्या शत्रूनेंच गुप्त हेर म्हणून पाठविलें असेल अशी मला शंका येते.' राजा म्हणाला, 'तसें कदाचित् असेल. पण एकदां त्याला पाहूं तर खरें!' असें म्हणून राजानें त्या दोघांनाहि आंत बोलाविलें. त्या प्रमाणें ते आंत गेले. पोपटानें राजास मुजरा करून म्हटलें, 'महाराज, चित्रवर्ण यांचा आपणांस असा निरोप आहे कीं, आपणांस राज्याची व जीवाची चाड असेल तर आम्हांस शरण यावें, नाहींतर राज्य सोडून चालतें व्हावें.' हा निरोप ऐकून हिरण्यगर्भ म्हणाला, 'या बेट्याला गचांडी देऊन घालवील असा कोणी आमच्या दरबारांत नाहीं काय?' हें ऐकतांच कावळा लटकाच रागाचा आवेश आणून म्हणाला, 'महाराज, आपला हुकूम होण्याचा काय तो अवकाश आहे. आतां याला स्वर्गाची वाट दाखवितों पहा.' पण प्रधान मध्यें पडल्यामुळें तसा कांहीं हुकूम राजानें दिला नाहीं. पोपट

दरबारांतून चालता झाला. पण कावळ्याच्या या भाषणानें राजाचा विश्वास त्याच्यावर बसला, आणि त्याला त्याच्या मंडळीसुद्धां सैन्यांत आश्रय मिळाला.

लवकरच बातमी येऊन पोंचली कीं, राजा चित्रवर्ण याच्या सैन्याचा तळ जवळच मलय पर्वताच्या पायथ्याशीं येऊन पडला आहे. ही बातमी ऐकून प्रधान चक्रवाक म्हणाला, 'महाराज, गुप्त हेरांकडून मला कळलें आहे कीं, आपल्या इकडील बातमी शत्रूला कळते. ती कळविणारा कावळाच असला पाहिजे अशी मला शंका येते.' यावर राजा हंसून म्हणाला, 'छे:, ही भलतीच शंका आहे! तो जर शत्रूच्या पक्षाचा असता, तर चित्रवर्ण राजाकडून निरोप घेऊन येणाऱ्या पोपटाला मारण्यास तो कसा तयार झाला असता?'

लवकरच दोन्ही सैन्यांत भयंकर युद्ध झालें. त्यांत एके दिवशीं सेनापति सारस यानें पुष्कळ जलचर पक्षी मारले. त्यावरून शत्रूचा सेनापति गृध्र यानें आवेशानें चाल करून हिरण्यगर्भाच्या किल्ल्याला वेढा घातला. इकडे मेघवर्ण कावळा व त्याचे सोबती यांनीं प्रत्येक घरांत विस्तव फेंकून देण्याचा सपाटा चालविला. त्यामुळें किल्ल्यांतल्या सगळ्या घरांना आग लागली. त्या आगीच्या ज्वाळा व धूर पाहून 'किल्ला घेतला, किल्ला घेतला' अशी एकच ओरड ऐकून किल्ल्यावरच्या लढणाऱ्या शिपायांना वाटलें कीं, शत्रु खरोखरच आंत शिरून चोंहींकडे आगी लावीत आहेत. त्यामुळें ते घाबरून पळत सुटले. लवकरच राजा हिरण्यगर्भ व सेनापति सारस यांनाहि शत्रूच्या सैन्यांनीं घेरलें. तें पाहून राजा सेनापतीला म्हणाला, 'मी तर अडकलोंच आहे. पण तुम्ही तरी आतां तेथून पाण्यांत बुडी मारून

निसटून जा, आणि प्रधानाच्या सल्ल्यानें कुमार चूडामणि याला गादीवर बसवून राज्याचें रक्षण करा.'

राजाचें तें भाषण ऐकून सेनापतीच्या मनाला अतिशय दुःख झालें. तो म्हणाला. 'असे मनाला झोंबणारे शब्द बोलूं नका. या किल्ल्याच्या रक्षणाचें काम जर आपण माझ्यावर सोंपविलें आहे, तर माझ्या रक्तमांसाचा कोट करून त्यांत मीं आपणांला सुखरूप ठेवीन. जर मृत्यु यायचाच असला तर पळून जाण्यापेक्षां तो रणभूमीवर आलेला चांगला. त्यानें अब्रूला कलंक तरी लागावयाचा नाहीं.' इतक्यांत एका कोंबड्यानें येऊन नखांनीं राजहंसाचें अंग ओरबाडलें. तेव्हां सारसानें त्याला पोटाशीं कवटाळून धरलें, आणि पाण्यांत सोडून दिलें. किल्ला चित्रवर्ण राजाच्या हातीं लागला. तेव्हां राजाच्या नांवानें चोहींकडे जयध्वनि करण्यांत आला. आज कावळ्यानें जय मिळवून दिला म्हणून त्यालाच त्या राज्याच्या गादीवर बसवावें असा चित्रवर्णानें मनांत विचार केला. पण गृध्र प्रधानानें म्हटलें, 'महाराज, हा विचार बरोबर नाहीं. हा कावळा दगलबाज आहे. आज यानें शत्रूशीं दगलबाजी केली, उद्यां कदाचित् हा आपल्याशीं करील. कोणीं त्याचा नेम सांगावा? आतां पावसाळा जवळ आला आहे. पाऊस पडून चोंहीकडे पाणी झाल्यावर हा जलचर पक्ष्यांना जाऊन मिळेल, आणि मग आपणाला परतहि जातां येणार नाहीं.' इकडे सेनापति सारस यानें हिरण्यगर्भ राजाला म्हटलें, 'महाराज, चित्रवर्णाच्या प्रधानानें आपणांशीं तह करण्याचा सल्ला राजाला दिली आहे. पण राजा जय मिळाल्यानें इतका फुगला आहे कीं. तो प्रधानाचें म्हणणें ऐकत नाहीं. यासाठीं माझ्या मनांत येतें कीं, माझा

मित्र सिंहलद्वीपचा राजा याला सैन्य घेऊन या राजावर स्वारी करून येण्यास सांगावें म्हणजे ही बातमी कळतांच चित्रवर्ण तह करण्याला कबूल होईल.' हिरण्यगर्भराजाला ही गोष्ट पटली, तेव्हां त्यानें विचित्र नांवाच्या एका बगळ्याच्या हातीं एक सांकेतिक लिपींत लिहिलेलें पत्र देऊन त्याला सिंहलद्वीपाला पाठविलें. त्याप्रमाणें सिंहलद्वीपचा राजा सैन्य घेऊन आला. ही बातमी कळतांच चित्रवर्ण हिरण्यगर्भाशीं तह करून स्वदेशीं चालता झाला.

**शिकावयाचें काय ?**— १ संकटाचे वेळीं धीर धरावा. २ शक्तीनें काम होण्यासारखें नसेल तेथें तें युक्तीनें करावें. ३ आपल्याला जें खरें व मालकाच्या हिताचें वाटतें तें स्पष्टपणें पण नम्रतेनें सांगण्यास भिऊं नये. ४ दगलबाजावर विश्वास ठेवूं नये.


## १५. पक्षी आणि वानर

एका मोठ्या झाडावर अनेक पक्षी घरटीं करून राहत होते. एके दिवशीं सकाळपासून जोराचा पाऊस पडूं लागला. कांहीं वेळानें पक्ष्यांनीं खालीं पाहिलें. तेव्हां एक वानर त्या झाडाखालीं थंडीनें कुडकुडत बसलेलें दिसलें. ते त्या वानराला म्हणाले, 'अरे, देवानें आम्हांला हात दिले नाहींत, तरी आम्ही चोंचींत गवताच्या काड्या आणून घरटीं बांधून राहतों. तुला तर देवानें माणसासारखे चांगले हातपाय दिले आहेत. असें असून तूं कष्ट कां सोसतोस ?'

तें ऐकून वानराला वाटलें कीं, हे पक्षी घरट्यांत बसून आपल्या शहाणपणाचा मोठा दिमाख दाखवीत आहेत, आणि आपणांस हिणवीत आहेत; यांची खोड मोडली पाहिजे. म्हणून अंमळशानें पाऊस थांबल्यावर त्यानें झाडावर चढून त्या सर्वांचीं घरटीं मोडून टाकलीं.

**शिकावयाचें काय ?**—हिताची गोष्ट सांगावयाची झाली तरी ती भलत्यासलत्याला सांगू नये. दुष्टांना उपकार करणारे व अपकार करणारे दोघेहि सारखेच वाटतात.

## १६. वाघाचें कातडें पांघरणारें गाढव



एका धोब्याचें गाढव त्याला पोटभर खाण्यास न मिळाल्यामुळें रोडावलें होतें. म्हणून त्या धोब्यानें त्याच्या अंगावर वाघाचें कातडें घालून त्याला धान्याच्या शेतांत सोडून दिलें. त्याला पाहून व वाघ आला असें समजून शेतकरी भीतीनें पळून जात, आणि मग तें गाढव पोटभर त्या शेतांत चरत असे. एकदां एक शेतकरी कांबळ्यानें आपलें अंग झांकून व हातांत तीरकमठा घेऊन एका ठिकाणीं लपून बसला. गाढव चरत चरत त्याच बाजूला गेलें. कांबळ्याचा भुरका रंग पाहून त्याला वाटलें कीं, हें दुसरें गाढव येथें आलें आहे. म्हणून मोठ्यानें शब्द करीत तें त्याच्या अंगावर धावून गेलें. शेत-

कऱ्यानें त्याच्या आवाजावरून हें गाढव आहे, वाघ नाहीं, असें ओळखलें, आणि त्याला खूप बडवून मारून टाकिलें.

**शिकावयाचें काय ?**—बाहेरचें सोंग आणणें सोपें आहे; पण सोंग आणल्यानें मूळ स्वभाव थोडाच पालटणार आहे ! तो बाहेर पडावयाचा तो पडतोच, आणि मग फजीती होऊन वेळेस नाशही होतो.

---

## १७. ससा आणि हत्तींचा कळप

एके वर्षीं पाऊस न पडल्यामुळें हत्तींच्या कळपाला पाणी पिण्यास मिळेनासें झालें. तेव्हां हत्ती आपल्या कळपाच्या नायकाला म्हणूं लागले, " प्रभो, सगळ्या नद्या, ओढे व तलाव आटले; कोठेंहि पाणी पिण्यास मिळत नाहीं. आतां आम्ही काय करावें ? ' नायक म्हणाला, ' काळजी करूं नका. मी त्याचा बंदोबस्त करतों. ' त्यानें पुष्कळ हिंडून एक सुंदर स्वच्छ पाण्यानें भरलेलें सरोवर शोधून काढलें व हत्ती रोज तेथें रात्रीं पाणी पिण्यास जाऊं लागले. त्या सरोवराजवळ कांहीं ससे राहत होते. ते रोज हत्तींच्या पायांखालीं चेंगरून मरूं लागले. तेव्हां आतां काय करावें याचा विचार त्या सशांना येऊन पडला. त्या सशांत एक फार शहाणा होता. तो म्हणाला, ' कांहीं चिंता नाहीं. मी याचा बंदोबस्त करतों; ' असें म्हणून हत्ती पाणी पिण्यास येण्याची वेळ झाली, तसा तो त्यांच्या वाटेवर एका उंच

टेकडीवर जाऊन बसला, आणि हत्ती आले तेव्हां त्यांना म्हणाला, " अहो हत्तींनो, मी भगवान् चंद्रमा यांचा दूत आहें. त्यांचा तुम्हांस असा निरोप आहे कीं, आम्ही या सरोवराचे रक्षणासाठीं सशांना मुद्दाम ठेविलें आहे. त्यांना तुम्ही रोज पायांखालीं चेंगरून मारतां हें ठीक नाहीं. ' तें ऐकून हत्तींनीं विचारलें, ' कोठें आहेत तुमचे चंद्रमा महाराज ? ' इतक्यांत चंद्र उगवला व त्याचें प्रतिबिंब पाण्यांत पडलें. पाणी हालत असल्यामुळें तें प्रतिबिंबही हालत होतें. तें दाखवून ससा म्हणाला, " ते पहा आमचे महाराज रागानें कसे कांपत आहेत ते ! तुम्ही शहाणे असाल तर मागल्या पायीं येथून चालते व्हा; नाहींतर तुमचा नाश होईल. " हें ऐकून हत्ती घाबरले आणि पळून गेले. ते पुनः तेथें आले नाहींत.

**शिकावयाचें काय ?**—शत्रु बळवान् असला, तर युक्तीनेंच त्याच्यापासून आपलें रक्षण करून घेतलें पाहिजे.

---

## १८. कावळा आणि गांजीण पक्षी

एका झाडावर एक कावळा राहत होता. त्याच झाडाखालीं एक गांजीण पक्षी राहत असे. एकदां पक्ष्यांचा मोठा उत्सव होता. त्या उत्सवासाठीं सगळे पक्षी गरुडाबरोबर समुद्रावर गेले होते. त्यांना जाऊन मिळण्याकरितां गांजीण पक्षीही कावळ्याबरोबर जात होता.

वाटेंत एक गवळी डोक्यावर दह्याचें भांडें घेऊन जात असलेला दिसला. त्याबरोबर कावळा त्या भांड्यावर बसून दहीं खाऊं लागला. गवळ्यानें पुष्कळ वेळां त्याला हाकलून लाविलें तरी तो पुनः पुनः येऊन बसे आणि दहीं खाई. शेवटीं त्रासून खालीं जमिनीवर भांडें ठेवून गवळी वर टक लावून पाहूं लागला. तेवढ्यांत कावळा पळून गेला. पण गांजीण पक्षी मात्र त्याच्या तावडींत सांपडला. तेव्हां गवळ्यानें त्याला मारून टाकिलें.

**शिकावयाचें काय ?**—वाईट संगत धरल्यानें एकादे वेळीं आपली चूक नसतां विनाकारण दंड भोगावा लागतो.

---

## १९. न्हावी आणि क्षत्रिय

अयोध्या नगरींत चूडाकर्ण नांवाचा एक क्षत्रिय राहत होता. त्यानें आपणांस धन मिळावें म्हणून शंकराची आराधना केली. तेव्हां शंकराच्या कृपेनें त्याला स्वप्नांत कुबेराचें दर्शन झालें. कुबेरानें त्याला म्हटलें कीं, तूं सकाळीं उठून हातांत एक सोटा घेऊन आपल्या घरच्या अंगणांत उभा रहा, आणि जो भिक्षेकरी अगोदर येईल त्याच्या डोक्यांत तो सोटा घाल; म्हणजे तो मरून सोन्याचा होईल. क्षत्रियानें तसें केलें. तेव्हां कुबेरानें सांगितल्याप्रमाणें त्याला सोनेंच सोनें मिळून तो श्रीमंत झाला. त्या

क्षत्रियाची हजामत करण्यासाठीं त्याच वेळीं एक न्हावी आला होता. त्यानें तें पाहिलें, आणि श्रीमंत होण्याला ही चांगली युक्ति आहे असें समजून त्यानेंही दुसरे दिवशीं सकाळीं आपल्या घरांतल्या अंगणांत उभें राहून जो भिक्षेकरी अगोदर आला त्याच्या डोक्यांत सोटा मारला. तो भिक्षेकरी सोन्याचा तर झाला नाहींच, पण माणसाचा खून केल्याबद्दल त्या न्हाव्याला मात्र फाशीं जावें लागलें.

**शिकावयाचें काय ?**—नीट विचार न करतां आंधळेपणानें दुसऱ्यासारखें केल्यानें न्हाव्यासारखी शिक्षा भोगावी लागते.

## २०. कासव आणि राजहंस

एका तळ्यांत एक कासव व दोन राजहंस राहत होते. त्यांच्यामध्यें चांगली मैत्री होती. एके दिवशीं तेथें कांहीं कोळी लोक आले आणि म्हणूं लागले कीं, आजची रात्र येथेंच काढूं. उद्यां सकाळीं येथें मासे धरून मग घरीं जाऊं. हें त्यांचें बोलणें कासवानें ऐकलें व तें राजहंसाला म्हणालें, ‘ आतां येथें राहण्यांत अर्थ नाहीं. दुसऱ्या तळ्यांत गेलें पाहिजे. ’ राजहंस म्हणाले, ‘ तूं म्हणतेंस तें खरें; पण तूं जाणार कसें ? जमिनीवरून चालत गेलेंस तर पकडलें जाशील. ’ कासव म्हणालें, ‘ याला एक युक्ति आहे. एक काठी तुम्हीं दोघांनीं आपल्या चोंचींत धरावी, आणि मीं त्या काठीला धरून लोंबकळावें. तुम्ही ती काठी चोंचींत धरून उडा-

लांत म्हणजे अनायासें मला आकाशांतून जातां येईल." राजहंस म्हणाले, 'युक्ति छानदार आहे खरी; पण तूं मध्यें तोंड उघडतां कामा नये.' कासव म्हणालें, 'मी तोंड उघडीन इतकें वेडें आहें असें का तुम्ही समजतां?' 'बरें आहे तर, आम्ही तुला नेतों' असें म्हणून दुसरे दिवशीं सकाळीं त्या दोघां राजहंसांनीं चोंचींत काठी धरली, व मध्यें ती तोंडांत धरून तिच्या आधारानें तें कासव लोंबकळलें. राजहंसही त्याला घेऊन आकाशांत भराऱ्या मारीत चालले. वाटेंत गुराख्यांची कांहीं मुलें रानांत गुरें चारीत होतीं. त्यांनीं वर पाहिलें. तेव्हां त्यांना मोठी गंमत वाटली. त्यांतला एक-जण म्हणाला, 'हें कासव जर पडलें, तर आपण येथल्या येथें त्याचा चट्टामट्टा करूं.' दुसरा म्हणाला, 'वारे! कच्चेंच का खायचें? घरीं नेऊन चांगलें भाजून खाऊं.' तिसरा म्हणाला, 'भाजायला घरींच कशाला न्यायला पाहिजे? येथेंच नाहीं का भाजून खातां येणार?' हीं त्या मुलांचीं बोलणीं ऐकून कासवाच्या अंगाचा संताप झाला, आणि आपण काय करीत आहों याचा विचार न राहून त्यानें बोलण्यासाठीं तोंड उघडलें. त्याबरोबर तोंडांतली काठी निसटून तें खालीं पडलें.

**शिकावयाचें काय?**—दुसऱ्यांनीं आपली निंदा केली तरी तिला उत्तर देण्याच्या भानगडींत पडूं नये. आपण कोठें आहों व काय करीत आहों याचा पूर्ण विचार करून योग्य दिसेल तसें वागावें.

# २१. कोळी आणि मासे

एका वनांत एक मोठें तळें होतें. त्यांत कांहीं मासे रहात होते. त्यांत तीन मुख्य होते. तिघांचे स्वभाव तीन प्रकारचे होते. संकट येण्याच्या अगोदरच त्याचा बंदोबस्त करण्याचा पहिल्याचा स्वभाव असे. संकट येऊन बेतल्यावर तें कसें टाळावें हें दुसऱ्याला आयतेवेळीं सुचत असे; आणि जें व्हायचें तें चुकत नाहीं असें म्हणणारा तिसरा मासा होता.


एकदां कांहीं कोळी मासे धरण्यासाठीं उद्यां त्या तळ्यावर येणार अशी खबर आली. त्याबरोबर पहिला मासा म्हणाला, 'आज रात्रींच येथून चालते व्हावें हें बरें.' त्याच्या म्हणण्याप्रमाणें तो व दुसरे कांहीं मासे आदल्या रात्रींच पळून गेले. दुसरा म्हणाला, 'कोळी आल्यावर त्याचें पाहतां येईल. आतांच त्याचा विचार कशाला?' त्याच्या म्हणण्याप्रमाणें कांहीं मासे राहिले. तिसरा म्हणाला, 'व्हायचें असेल तें चुकत नाहीं.' असें म्हणून तो तेथेंच राहिला, व त्याजबरोबर दुसरे मासेहि राहिले.

दुसरे दिवशीं कोळ्यांनीं जाळें टाकिलें व त्यांत मासे अडकले. तेव्हां दुसरा मासा आपल्या सोबत्यांना म्हणाला, 'कोळी तुम्हांला पकडील तेव्हां मेल्याचें सोंग करून पडा, आणि तो तुम्हांला जमिनीवर टाकून जाळें गुंडाळूं लागला, म्हणजे पटकन् पाण्यांत उडी मारा.' त्यांनीं तसें केलें तेव्हां ते वांचले. पण तिसऱ्याच्या म्हणण्या-

प्रमाणें जे दैवावर भरंवसा ठेवून बसले ते मात्र प्राणास मुकले.

**शिकावयाचें काय ?**—संकटाचे वेळीं त्यांतून सुटण्याची युक्ति सर्वांनाच सुचते असें नाहीं. यासाठीं अगोदरपासून सावध राहावें हा उत्तम पक्ष. पण दैवावर भरंवसा ठेवून स्वस्थ बसणें ह्यासारखा वेडेपणा तर कोणताच नाहीं.

## २२. साप आणि बगळा



एक पर्वत होता. त्याच्या पायथ्याशीं एक रान होतें, व त्या रानांतून एक मोठी नदी वाहत होती. त्या नदीच्या कांठीं एका वडाच्या झाडावर कांहीं बगळे रहात होते, आणि त्याच झाडाच्या खालीं बिळांत एक सापहि राहत होता. बगळे बाहेर गेले म्हणजे तो साप त्या बगळ्यांचीं पिलें खात असे. याला काय उपाय करावा म्हणून एके दिवशीं ते सगळे बगळे एकत्र बसून विचार करूं लागले. तेव्हां त्यांतला एक म्हातारा बगळा म्हणाला, ‘ मला एक उपाय दिसतो. तो हा कीं, पलीकडे एका बिळांत मुंगुस राहत असतें. तुम्ही कांहीं मासे मारून आणा आणि त्या मुंगसाच्या बिळापासून तों सापाच्या बिळापर्यंत ते पसरून ठेवा. म्हणजे त्या माशांच्या वासानें मुंगुस माग काढीत काढीत सापाच्या बिळांत जाईल. ’ ही युक्ति सर्वांना आवडली आणि त्यांनीं तसें केलें. मुंगुसही माग काढीत काढीत

सापाच्या बिळांत गेलें व सापाला मारून बाहेर आलें. पण इतक्यांत झाडावर पक्ष्यांच्या पिलांचा किलबिलाट ऐकून तें झाडावर चढलें, आणि त्या पिलांनाहि त्यानें खाऊन टाकिलें.

**शिकावयाचें काय?**—कोणत्याहि उपायाचा बरेवाईटपणा ठरवितांना त्यापासून कांहीं अपाय होण्यासारखा आहे कीं काय तेंही त्याबरोबर पाहिलें पाहिजे.

---

## २३. तपस्वी आणि उंदीर

एक तपस्वी मठांत राहत असे. एकदां तो मठापाशीं बसला असतां वरून एका कावळ्याच्या तोंडांतून उंदराचें पिलूं खालीं पडलें. तें अगदीं अर्धमेलें झालें होतें. त्याला पाहून त्या तपस्व्याला त्याची दया आली आणि त्यानें त्याला दाणापाणी देऊन मोठ्या प्रेमानें त्याचें लालनपालन केलें.

एके दिवशीं एक मांजर त्या उंदराला मारण्यासाठीं टपून बसलेलें त्या तपस्व्यानें पाहिलें. तेव्हां त्या तपस्व्यानें आपल्या सामर्थ्यानें त्या उंदराचें चांगलें बलवान् मांजर केलें. पुढें तें मांजर कुत्र्याला भिऊं लागलें, तेव्हां त्यानें त्याला वाघ केलें. तरी त्या तपस्व्याला तो वाघ उंदरासारखाच वाटे. पण मठांतले दुसरे लोक म्हणत कीं, 'लहानसें उंदराचें पिलूं होतें त्याचा तपस्व्याच्या कृपेनें केवढा बलवान् वाघ झाला आहे!' हें ऐकलें म्हणजे त्या वाघाला

वाईट वाटे. तो मनांत म्हणाला कीं, हा तपस्वी जिवंत आहे तों पर्यंत हे सगळे लोक मला अशींच नांवें ठेवणार. त्यापेक्षां या तपस्व्याला मारून टाकावें हें बरें. असें मनांत आणून तो एके दिवशीं त्या तपस्व्याच्या अंगावर धावून गेला. त्याबरोबर त्या तपस्व्यानें त्याला आपल्या सामर्थ्यानें पुनः उंदीर केलें.

**शिकावयाचें काय ?**–हलकट लोक मोठ्या अधिकारावर चढले कीं त्यांचे डोळे फिरतात, व ते उपकार करणारांना मुद्धां अपकार करण्यास सोडीत नाहींत. त्यांचा जन्मस्वभाव पालटत नाहीं.

## २४. बगळा आणि खेकडा

एक बगळा एका तळ्याचे कांठीं बसला होता. त्याचें तोंड उतरलेलें पाहून एक खेकडा म्हणाला, 'कांहो बगळे दादा ! तुम्ही असे उदास कां ?' बगळा म्हणाला, 'काय करूं ? माशांवर माझें पोट चालतें, आणि ते सगळे मासे कोळी उद्यां मारून घेऊन जाणार आहेत. तेव्हां उद्यांपासून माझें कसें होईल ही काळजी मला येऊन पडली आहे. त्या काळजीनें मला आज खाणें पिणें कांहीं सुचत नाहीं.' बगळ्याचे हे शब्द माशांनीं ऐकले, व ते म्हणूं लागले कीं, 'हा बगळा भला दिसतो. आतां आपले जीव वांचविण्याचा कांहीं उपाय हाच सांगेल. यालाच आपण विचारूं या.' त्यांनीं विचारलें, तेव्हां बगळा म्हणाला, 'उपाय आहे. पण तो तुम्ही केला पाहिजे.

तो उपाय हा कीं, येथून कांहींसें दूर एक तळें आहे. तेथें एकेकाला पाहिजे तर मी नेऊन सोडीन.' जीव वांचविण्यासाठीं माशांनीं तें कबूल केलें. मग त्या लुच्च्या बगळ्यानें एकेका खेपेला एकेक मासा चोंचींत धरून न्यावा, आणि वाटेंतच एके ठिकाणीं खाऊन टाकावा. अशा बऱ्याच खेपा केल्या. शेवटीं खेकड्याची पाळी आली. खेकड्याचें मांस केव्हां खाण्याला मिळेल, म्हणून बगळ्याच्या तोंडाला पाणी सुटलेंच होतें. त्यानें त्या खेकड्याला चोंचींत धरून पूर्वींच्या जागीं नेलें. तेथें माशांचीं हाडें पडलेलीं पाहून या दुष्टानें मासे खाल्ले अशी त्याची खात्री झाली, आणि त्यानें त्या बगळ्याच्या गळ्याचा कडकडून चावा घेऊन त्याला मारून टाकिलें.

**शिकावयाचें काय ?**—मनुष्याची परीक्षा त्याच्या बोलण्यावरून करूं नये; कृतीवरून करावी.

---

## २५. ब्राह्मणाचें सुखस्वप्न

कोणी एक ब्राह्मण होता. त्याला संक्रांतीचे दिवशीं कोणीं सातूच्या पिठानें भरलेलें सुगड दान दिलें. त्यामुळें आनंदित होऊन तो घरीं येत होता. दुपारची उन्हाची वेळ असल्यामुळें तो थकला आणि वाटेंत एका कुंभाराच्या येथें क्षणभर विसावा घेण्यासाठीं बसला. सुगडांतील पीठ खाण्याकरितां येणाऱ्या कावळ्यांना हांकण्यासाठीं त्यानें हातांत काठी ठेवली होती. बसल्या

बसल्या तो विचार करायला लागला आणि मनांत म्हणाला, ‘ आतां हें सुगड व पीठ विकून दहा पैसे येतील, मग त्या भांडवलावर पुनः आणखी सुगडें व पीठ यांचा व्यापार केला तर बराच फायदा होईल. मग आपली पुंजी सुपारी, कापडचोपड, इत्यादि जिनसांच्या व्यापारांत क्रमाक्रमानें घातली तर कांहीं दिवसांनीं एक लाख रुपये गांठीं राहतील. मग चार लग्नें करतां येतील. पण जी स्त्री सर्वांत सुंदर असेल तिच्यावरच आपली प्रीति राहील. हें पाहून तिच्या सवती आपापसांत भांडतील. मग त्यांच्या पाठींत असा जोरानें काठीचा तडाखा देईन.’ असें म्हणून त्यानें हातांतली काठी खरोखरच आपटली. त्याबरोबर कुंभाराच्या दुकानांतली मडकीं फुटून त्यांचा चूर झाला. त्याचा आवाज ऐकून कुंभार घरांतून धांवत आला, आणि त्या ब्राह्मणाला त्यानें गचांडी देऊन बाहेर घालविलें.

शिकावयाचें काय ?—जे कोणी पुढें आपणांस अशीं सुखें भोगण्यास मिळतील आणि तशीं मिळतील, अशीं स्वप्नें पाहण्यांतच गुंग होतात, त्यांना पुढेंहि सुख लागत नाहीं व आतांच्या काळींहि मिळत नाहीं. दोन्ही सुखांना ते मुकतात.



## २६. उंट आणि सिंह

एक होता सिंह. कावळा, वाघ आणि कोल्हा असे तिघे त्याचे नोकर होते. त्यांनीं एके दिवशीं एक उंट आणिला व खाण्यासाठीं सिंहाच्या पुढें उभा केला. पण सिंहानें त्याला न खातां उलट त्याला आपल्याजवळ नोकरीस ठेविलें.

पुढें कांहीं दिवसांनीं मुसळधार पाऊस पडूं लागला. सिंहासाठीं कांहीं शिकार धरून आणण्यास बाहेर पडण्याची सोय नव्हती. तेव्हां त्या तिघांनीं बेत केला कीं, आज सिंहाला खायला द्यायला आपलेजवळ कांहीं नाहीं; तेव्हां आज त्याच्याकडून उंटाला खाववावें. दुपारची वेळ झाली. खाण्यासाठीं आज काय आणिलें आहे असें सिंहानें विचारलें. तेव्हां त्या तिघांनीं सांगितलें, ' महाराज, आज यथेच्छ खाण्यासारखें असतां महाराजांनीं कां त्याबद्दलचं येवढी काळजी करावी ? ' सिंहानें काय आहे असें विचारलें, तेव्हा तिघांनीं उंटाकडे बोट दाखविलें. सिंह म्हणाला, ' छे: छे: ! ज्याला आपण आश्रित केलें आहे, त्याला कसें खायचें ? ' यावर ते तिघे म्हणाले, ' त्यानें आपण होऊन स्वत:चा देह अर्पण केल्यावर मग तर हरकत नाहीं ? ' सिंहानें तें कबूल केलें.

मग कावळ्यानें मोठ्या चातुर्यानें बोलून उंटाला सिंहाकडे नेलें. इतक्यांत वाघ आणि कोल्हा हेही दोघे तेथें आले आणि म्हणाले,

'महाराज, आज शिकार शोधशोध शोधली, पण कांहीं एक हातीं लागलें नाहीं. तेव्हां आतां आमचें मांस खाऊन आपण वेळ भागवावी. मालकासाठीं आम्ही स्वतःचे प्राण देण्यास तयार आहों.' सिंहानें त्यांना शाबासकी दिली आणि 'तुम्हांला खाण्याची मला इच्छा नाहीं' असें सांगितलें. हें पाहून उंटाला वाटलें कीं, सिंह आपणांलाहि खायचा नाहीं. मग फुकाची शाबासकी तरी कां हातची घालवा ? म्हणून त्यानेंही म्हटलें, 'महाराज, मी हें आपलें शरीर प्रभूला अर्पण करण्यास तयार आहें.' हें ऐकतांच तिघांनीं सिंहाला खूण केली, आणि सिंहानें 'बरें आहे तर. जशी तुझी इच्छा' असें म्हणून त्याला फाडून खाल्लें.

**शिकावयाचें काय ?**—जें खरोखर मनापासून नाहीं असें तोंडदेखलें बोलणें बोलूं नये. नाहींतर एखादे वेळीं त्याच्यापायीं नाश होतो.

---

## २७. बेडूक आणि सर्प

एक म्हातारा साप खाण्यास मिळविण्याची शक्ति अंगांत नसल्यामुळें मेल्याप्रमाणें स्वस्थ पडून होता. त्याला एका बेडकानें विचारलें, 'सापदादा, तुमची अशी अवस्था कशानें झाली ?' साप म्हणाला, 'काय सांगूं माझी कर्मकथा ! वीस वर्षांमागें मी एका

ब्राह्मणाच्या मुलाला चावलों. तेव्हां त्यानें मला शाप दिला कीं तूं बेडकाचें वाहन होऊन आपले आयुष्याचे दिवस काढशील त्या शापानें मी अगदीं निर्जीव झालों आहें; कोणी बेडूक माझ्या डोक्यावर बसायला मिळेल अशा आशेवरच जीव धरून राहिलों आहें.' बेडकाला त्याची दया आली, आणि त्यानें आपल्या राजाकडे जाऊन त्याला सगळी हकीकत सांगितली. बेडकांच्या राजालाही वाटलें कीं, आपणाला सर्पाचें वाहन आयतें मिळतें आहे ही भाग्याची गोष्ट आहे. तो येऊन सर्पाचे मस्तकावर बसला. पण साप अगदीं हळू हळू चालत होता. तेव्हां राजानें विचारलें, 'तूं लवकर कां चालत नाहींस?' साप म्हणाला, 'मी उपाशी असल्यामुळें माझे अंगांत चालण्याची शक्ति नाहीं.' तेव्हां राजानें त्याला कांहीं बेडूक खाण्याची परवानगी दिली. त्या सापानें त्या परवानगीनें अगोदर बाकीचे बेडूक खाऊन टाकिले आणि मग खुद्द त्या राजालाच खाल्लें.

**शिकावयाचें काय?**—शत्रु कितीहि दीन दिसला, तरी त्याच्या भरवंशावर राहूं नये. तो केव्हां उलटेल याचा नेम नसे २

...पाळ ... जोशी,
...४३, सदाशिव पेठ, पुणें २.

IRBK-0109120